Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४९ ।पान ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**धुळ्यात 'अवैध धंद्यांची दहीहंडी' फोडत महिलांचा प्रशासनाला इशारा!**

(पान २ वर)



» Selected

### मराठवाड्यात महाभयंकर दुष्काळाची दाहकता

धाराशिव : पावसाने दिलेल्या दांडीमुळे राज्यातील बहुतांश भागातील बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अशातच मराठवाड्यावर महाभयंकर दुष्काळाचे संकट घोंगावत आहे. धाराशिव जिल्ह्यातही लाखो हेक्टरवर पेरणी केलेलं सोयाबीन अक्षरशः करपून गेलं आहे. ही दुष्काळाची दाहकता सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी आता सरकारचे प्रतिनिधी असलेल्या शिवसेना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी धाराशिवमध्ये स्वतः सोयाबीनच्या शेतात जात शेतकऱ्यांशी संवाद साधला आहे.

दुष्काळाची दाहकता भयंकर आहे. सोयाबीनची पेरणी करण्यासाठी केलेला खर्चही निघणार नाही, अशी एकंदरीत परिस्थिती जिल्ह्यात आहे. सगळीकडे भयाण परिस्थिती, शेतकऱ्याच्या पदरात काही पडेल अशी सध्या स्थिती नसल्याची भीती शिवसेना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली आहे.

## मोर्चा काढण्याचा आदिवासी आंदोलकांचा निर्णय, सचिव-आयुक्त हटविण्याच्या मागणीवर विद्यार्थी ठाम

# 'उलगुलान' महामोर्चा आता मुंबईकडे!

### मंत्री-अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा, सरकारसमोर उलगुलान आंदोलनाचे नवे आव्हान

**जन सम्राट टाईम्स**

**नाशिक: । आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याच्या निषेधार्थ नाशिकमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेले उपोषण मागे घेतल्यानंतर आदिवासी आंदोलकांनी आता मुंबईकडे मोर्चा वळवला आहे. आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांचा राजीनामा, तसेच विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि आयुक्त लीना बनसोड यांना पदावरून हटविण्याच्या मागणीसाठी मुंबईत उलगुलान महामोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

नाशिकमध्ये धरणे आंदोलन कायम ठेवत पुढील आठवड्यात आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणे आणि संबंधित मंत्री-अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. या उलगुलान आंदोलनात' सीजेपी'चे अध्यक्ष अभिजित दीपके यांच्यासह राज्यभरातील आदिवासी आंदोलक सहभागी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सरकारसमोर उलगुलान आंदोलनाचे नवे आव्हान उभे ठाकण्याची शक्यता आहे. राज्यातील आदिवासी वसतिगृहांमधील असुविधा, सेंट्रल किचन रद्द करणे, डोनेशनच्या नावाखाली आदिवासी विद्यार्थ्यांची



होणारी आर्थिक लूट, तसेच गेल्या दोन वर्षांत वसतिगृहांतील ५९३ विद्यार्थ्यांच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित करीत आदिवासी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. या सर्व परिस्थितीसाठी आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके, विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि आयुक्त लीना बनसोड जबाबदार असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. डॉ. उईके यांचा राजीनामा घेण्यात यावा, तसेच सचिव वाघमारे आणि आयुक्त बनसोड यांना तातडीने हटवावे, या मागणीसाठी राहुल पावरा, लक्ष्मी जाधव आणि विवेक गावित यांनी दोन आठवड्यांपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे धरणे आंदोलनही सुरू होते. हे आंदोलन मागे घेण्यासाठी आदिवासी आयुक्तालयाकडून प्रयत्न झाले; मात्र ते निष्फळ ठरले. उलट आंदोलनाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढत गेला. आदिवासी विद्यार्थी मुंबईत आंदोलन करणार; राहुल गांधी, ठाकरे, अभिजीत दिपकेही मैदानात शासनाकडून आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने संतप्त आंदोलनकर्त्यांनी १ सप्टेंबर रोजी आदिवासी आयुक्तालयावर उलगुलान महामोर्चा काढत जोरदार शक्तिप्रदर्शन केले आणि मागण्यांवर ठाम असल्याचे दाखवून दिले. त्यानंतर सीजेपी प्रमुख अभिजित दीपके, काँग्रेस नेते राहुल गांधी, शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासह विविध नेत्यांनी आंदोलकांची भेट घेऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. अखेर शुक्रवारी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मध्यस्थी केल्यानंतर तिन्ही विद्यार्थ्यांनी आमरण उपोषण मागे घेतले. मात्र, नाशिकमधील आंदोलन कायम ठेवत मुंबईत उलगुलान महामोर्चा काढण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

### महाविकास आघाडीचे बळ

नाशिकमध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, शिवसेना उबाठा नेते आदित्य ठाकरे, सीजेपीचे अभिजित दीपके यांनीही उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे मुंबईत होणारा उलगुलान महामोर्चा राज्यव्यापी स्वरूपाचा राहण्याची शक्यता आहे. या मोर्चात अभिजित दीपके, आदित्य ठाकरे यांच्यासह राहुल गांधीदेखील उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## दहीहंडी उत्सवाला गालबोट; मुंबईत सात वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू, विटांचा खांब कोसळला

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** उत्साह, जल्लोष आणि थराराने साजऱ्या होणाऱ्या दहीहंडी उत्सवाला मुंबईत दुर्दैवी घटनेने गालबोट लागले. मालाड पश्चिमेतील मालवणी परिसरात दहीहंडी फोडण्याच्या तयारीदरम्यान विटांचा खांब कोसळल्याने सात वर्षांचा चिमुकला गंभीर जखमी झाला. रुद्र कदम असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव असून, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत इतर काही जणही जखमी झाल्याची माहिती आहे. ही घटना शनिवारी (५ सप्टेंबर) दुपारी सुमारे तीन वाजता मालाड पश्चिमेतील चिकुवाडी, मालवणी, मार्वे रोड परिसरातील एकता वेलफेअर सोसायटीजवळ घडली. सोसायटीतील खोली क्रमांक २३ परिसरात स्थानिक मुले दहीहंडीचा उत्सव साजरा करत होती. दोरी तोडताच खांब कोसळला दहीहंडी फोडण्यासाठी परिसरातील एका झाडाला तसेच तळमजल्यावरील विटांच्या खांबाला दोरी बांधण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या वेळी ही दोरी तोडण्याचा प्रयत्न सुरू



असतानाच विटांचा खांब अचानक कोसळला. खांबाचा काही भाग तेथे उपस्थित असलेल्या मुलांसह इतरांच्या अंगावर पडला. या दुर्घटनेत रुद्र कदम गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने मालवणी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही उपचारादरम्यान रुद्रचा मृत्यू झाला. चिमुकल्याच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, उत्सवाच्या आनंदावर शोककळा पसरली आहे. पोलीस, महापालिका कर्मचारी घटनास्थळी घटनेची माहिती मिळताच संबंधित वॉर्डचे कर्मचारी तसेच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दुर्घटनेची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. दहीहंडीच्या आयोजनासाठी उभारण्यात आलेली रचना आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबतही आता प्रश्न उपस्थित झाले आहेत. दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गर्दी, उंचीवरील रचना, दोर, खांब आणि इतर साहित्य वापरताना आवश्यक ती सुरक्षितता न पाळल्यास अशा दुर्घटना घडू शकतात. त्यामुळे सार्वजनिक तसेच स्थानिक पातळीवरील दहीहंडी आयोजनांमध्ये सुरक्षेचे नियम पाळण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. पुण्यातही स्टेज कोसळल्याची घटना दरम्यान, दहीहंडी उत्सवाशी संबंधित आणखी एक दुर्घटना पुण्यात घडल्याची माहिती समोर आली आहे. ४ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास जुनी सांगवी परिसरात दहीहंडी उत्सवासाठी उभारण्यात आलेल्या स्टेजची दुर्घटना घडली. त्यामुळे दहीहंडीच्या उत्सवात सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मुंबईतील मालवणी येथील घटनेत मात्र सात वर्षांच्या रुद्रचा जीव गेल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. उत्सवाचा आनंद साजरा करताना आयोजक आणि नागरिकांनी सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे किती आवश्यक आहे, हे या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

## दामिनी पथकाकडून विद्यार्थिनींना महिला व सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे** । दामिनी पथकाच्या वतीने पेट्रोलिंगदरम्यान मोराणे येथील भागाबाई ज्युनियर कॉलेजमध्ये विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसाठी महिला सुरक्षा, सायबर गुन्हे आणि वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या काळात मुलींनी कोणत्याही प्रकारच्या त्रासाला घाबरून न जाता आत्मविश्वासाने त्याचा सामना करावा, पालक किंवा शिक्षकांशी संवाद साधावा, असे आवाहन करण्यात आले. दामिनी पथकातील महिला पोलिस अंमलदार मृणालिनी भावसार यांनी विद्यार्थ्यांना सायबर क्राइम, दामिनी पथकाची भूमिका आणि महिला सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. 'गुड टच-बॅड टच'बाबत जनजागृती विद्यार्थ्यांनी आपल्या शरीराच्या वैयक्तिक मर्यादा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गुड टच आणि बॅड टच यातील फरक ओळखून चुकीच्या स्पर्शाबाबत गप्प न राहता तातडीने पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीला माहिती द्यावी, असे सांगण्यात आले. छेडछाड, त्रास किंवा पाठलागाच्या घटना घडल्यास त्या सहन न करता तत्काळ मदत मागावी. मदत मागणे ही कमजोरी नसून प्रसंगावधान आणि शहाणपणाचे लक्षण आहे, असा संदेशही विद्यार्थ्यांना देण्यात आला. सोशल मीडिया वापरताना सावधगिरी सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन मैत्री करताना सावधगिरी बाळगावी, ऑनलाइन ओळख झालेल्या व्यक्तीवर तातडीने विश्वास ठेवू नये, तसेच वैयक्तिक फोटो, मोबाईल क्रमांक, पासवर्ड, ओटीपी यांसारखी संवेदनशील माहिती कोणालाही देऊ नये.

## बालविवाह निर्मूलनासाठी २७ नोव्हेंबर 'आंतरराष्ट्रीय दिवस' घोषित

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ, जि. जळगाव । प्रतिनिधी:** संयुक्त राष्ट्रसंघाने २७ नोव्हेंबर हा दिवस 'बाल, अल्पवयीन आणि सक्तीच्या विवाह निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून घोषित केल्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे आधार बहुउद्देशीय संस्थेने स्वागत केले आहे. बालविवाह निर्मूलनासाठी कार्यरत असलेली आधार बहुउद्देशीय संस्था ही Just Rights for Children (JRC) नेटवर्कची भागीदार संस्था आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या या निर्णयामुळे भारतातून सुरू झालेल्या बालविवाह निर्मूलनाच्या अभियानाला जागतिक स्तरावर ऐतिहासिक मान्यता मिळाल्याचे संस्थेच्या प्रतिनिधींनी म्हटले आहे. बालविवाहविरोधी जनजागृतीला मिळणार नवी दिशा बालविवाह ही बालकांच्या शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासावर परिणाम करणारी गंभीर सामाजिक समस्या आहे.

त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे काम सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला. जळगाव जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध, जनजागृती



आणि बालकांच्या शिक्षणासाठी संस्थेचे कार्य अधिक प्रभावीपणे सुरू राहील, असे संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले. निर्णयाचे स्वागत संयुक्त राष्ट्रसंघाच्या या निर्णयाचे आधार बहुउद्देशीय संस्थेच्या प्रतिनिधी डॉ. भारती पाटील, रेणू प्रसाद आणि प्रा. डॉ. विजयकुमार वाघमारे यांनी स्वागत केले. या प्रसंगी आनंद पगारे, मोहिनी धनगर, दिपाली सुनील हिवाळे आणि सुनील जगन हिवाळे उपस्थित होते. बालविवाहमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी शासन, सामाजिक संस्था, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असून, आंतरराष्ट्रीय दिवसाच्या घोषणेमुळे या विषयावर जागतिक पातळीवर जनजागृतीला अधिक बळ मिळणार असल्याचे संस्थेच्या वतीने नमूद करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## शेतकरी केंद्रबिंदू मानून तलाठी कार्यालय लोकाभिमुख सेवेचे केंद्र बनावे

### पालकमंत्री गुलाबराव पाटील; बांभोरी बु. येथे २५ लाखांच्या नव्या तलाठी कार्यालयाचे लोकार्पण

**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी/धरणगाव/बांभोरी बु., | प्रतिनिधी:** ग्रामीण भागात शेतकऱ्यांचा महसूल प्रशासनाशी सर्वाधिक जवळचा संबंध तलाठ्याच्या माध्यमातून येतो. त्यामुळे शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून तलाठी कार्यालयातून महसूलविषयक सेवा तत्पर, पारदर्शक आणि नियमानुसार मिळाल्या पाहिजेत. तलाठी आणि शेतकरी यांच्यात नियमित संवाद व समन्वय ठेवून शेतकऱ्यांच्या महसूलविषयक अडचणी वेळेत मार्गी लावाव्यात. तलाठी आणि ग्रामसेवक ही पदे केवळ शासकीय नोकरी म्हणून न पाहता गावाची व सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची मोठी संधी म्हणून पाहावीत. प्रामाणिकपणे व मनोभावे काम करून जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद मिळवावा, असे प्रतिपादन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. बांभोरी बु. येथे नव्याने उभारण्यात आलेल्या २५ लाख रुपये खर्चाच्या तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, नवीन तलाठी कार्यालयामुळे महसूल प्रशासनाच्या कामकाजासाठी चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. या सुविधेचा प्रत्यक्ष लाभ शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मिळाला पाहिजे. तलाठी व ग्रामसेवक हे गाव पातळीवरील प्रशासन आणि जनता यांच्यातील महत्त्वाचे दुवे असून त्यांनी नागरिकांच्या



अडचणी समजून घेत सेवाभावाने आपली जबाबदारी पार पाडावी. बांभोरी बु. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. गावासाठी नवीन ग्रामपंचायत कार्यालय मंजूर करण्यात आले असून त्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. गावातील वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी अनेक विद्युत वितरण रोहित्रे (डीपी) मंजूर करण्यात आली असून पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक डीपी मंजूर करण्यासाठीही कार्यवाही करण्यात येईल.

गावातील विकासकामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

यावेळी तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी म्हणाले की, बांभोरी बु. येथील नव्या तलाठी कार्यालयामुळे शेतकरी व नागरिकांना महसूलविषयक सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. धरणगाव तालुक्यात महसूल प्रशासनाच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी ३६ तलाठी कार्यालयांच्या इमारतींसह ६ मंडळ अधिकारी कार्यालयांसाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नातून निधी मंजूर झाला आहे. यापैकी अनेक कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. याबद्दल त्यांनी पालकमंत्री पाटील यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या हस्ते उजळगाव मारुती मंदिर परिसरातील १० लाख रुपये खर्चाच्या पेव्हर ब्लॉक कामाचे तसेच साई सिटीमधील २० लाख रुपये खर्चाच्या रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. याप्रसंगी तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, मंडळ अधिकारी ज्योती चौधरी, ग्राम महसूल अधिकारी ज्योती लोखंडे, पोलीस पाटील ईश्वर साबळे, माजी सरपंच सुभाष पाटील, मार्केट कमिटीचे सभापती प्रेमराज पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत पाटील, सरपंच कमलाबाई बिल, उपसरपंच अनिता माळी, ग्रामपंचायत सदस्य नरेश पाटील, पूनम पाटील, माजी सरपंच प्रमोद जगताप, संजय पाटील, सजन पाटील, शाखाप्रमुख रामकृष्ण पाटील, दीपक भदाणे, प्रवीण मिस्त्री, प्रभाकर पाटील, भैया मराठे सर, न.पा.चे गट नेते विलास महाजन, नगरसेवक बुट्या पाटील यांच्यासह परिसरातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैया मराठे सर यांनी केले, तर कार्यक्रमाचे आयोजक तथा माजी सरपंच सुभाष पाटील यांनी आभार मानले.

## जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा नववा दिवस

**जन सम्राट टाईम्स**

**आंतरवाली सराटी| प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज नववा दिवस आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांनी पुन्हा उपचार आणि पाणी घेणे बंद केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे आंतरवाली सराटीसह राज्यभरातील समर्थकांमध्ये चिंता वाढली असून, जरांगे पाटील यांनी पाणी व उपचार नाकारू नयेत, अशी मागणी आंदोलक तसेच सरकारच्या गोटातूनही केली जात आहे. यापूर्वी सरकारच्या शिष्टमंडळाने आंतरवाली सराटीत येऊन जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे, कुणबी प्रमाणपत्राच्या व्हॅलिडिटीमधील अडथळे दूर करणे आणि ५२ लाख कुणबी नोंदींच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची मागणी ठामपणे मांडली. या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी त्यांनी सरकारला १० सप्टेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. मागण्या पूर्ण न झाल्यास मुंबईकडे धडकण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. मध्यरात्री दोन वेळा वैद्यकीय पथक दाखल जरांगे पाटील यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यासाठी वैद्यकीय पथक रात्री दोन वेळा उपोषणस्थळी आले. मात्र, तपासणी आणि उपचार घेण्यास त्यांनी नकार दिल्याने वैद्यकीय पथकाला उपचार न करताच परतावे लागले. सलग उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावत असल्याने समर्थकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांनी केलेल्या १४ मागण्यांपैकी सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर आतापर्यंत तीन मागण्यांच्या संदर्भात एकूण चार आदेश काढण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# धुळ्यात 'अवैध धंद्यांची दहीहंडी' फोडत महिलांचा प्रशासनाला इशारा! भगवा चौकात ॲड. पंकज गोरे यांच्या वतीने आयोजन

## बर्वे कन्या छात्रालयाच्या विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग, दहीहंडीच्या गाण्यांवर धरला ठेका

जन सम्राट टाईम्स

**धुळे, | प्रतिनिधी :** उत्सवाचा जल्लोष आणि सामाजिक जनजागृतीचा संदेश यांचा अनोखा संगम धुळे शहरातील भगवा चौकात पाहायला मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही ॲड. पंकज गोरे यांच्या वतीने महिला दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. मात्र, यंदाच्या दहीहंडीला सामाजिक विषयाची जोड देत 'अवैध धंद्यांची दहीहंडी' उभारण्यात आली. बर्वे कन्या छात्रालयाच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत ही दहीहंडी फोडत अवैध धंद्यांविरोधात जनजागृतीचा संदेश दिला. दहीहंडी म्हटली की गाणी, नृत्य, उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण होते. भगवा चौकातही विद्यार्थिनींनी दहीहंडीच्या गाण्यांसह आदिवासी गीतांवर नृत्य सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. गाण्यांच्या तालावर विद्यार्थिनींनी धरलेला ठेका आणि दहीहंडी फोडण्यासाठी केलेला उत्साही प्रयत्न यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

'अवैध धंद्यांची दहीहंडी' ठरली आकर्षण यंदाच्या उत्सवात केवळ मनोरंजनाला प्राधान्य न देता शहरातील एका गंभीर सामाजिक प्रश्नाकडे नागरिकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. धंद्यांची दहीहंडी' ही संकल्पना राबविण्यात आली.

दहीहंडी फोडाना विद्यार्थिनींमध्ये विशेष उत्साह दिसून आला. तरुण पिढीने अवैध धंद्यांपासून दूर राहावे आणि समाजातील चुकीच्या प्रवृत्तींविरोधात जनजागृती व्हावी, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थिनींना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न बर्वे कन्या छात्रालयाच्या विद्यार्थिनींना



आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे आणि त्यातून त्यांचे मनोबल वाढावे, या उद्देशाने ॲड. पंकज गोरे यांच्या वतीने दरवर्षी महिला दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही छात्रालयाच्या विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत दहीहंडी फोडली. आठ-नऊ दिवसांच्या आंदोलनाची पार्श्वभूमी या उपक्रमाला धुळे शहरासह जिल्ह्यातील कथित अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाची पार्श्वभूमी होती. ॲड. पंकज गोरे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या आठ ते नऊ दिवसांपासून अवैध धंद्यांविरोधात आंदोलन करण्यात आले होते.

अवैध धंद्यांना आळा घालावा, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि तरुणाईला या गैरप्रकारांपासून दूर ठेवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका या आंदोलनातून मांडण्यात आली होती. आंदोलनादरम्यान प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विविध अभिनव उपक्रमही राबविण्यात आले. प्रशासनाकडून मागण्यांबाबत आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, अवैध धंद्यांविरोधातील जनजागृती सुरूच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून महिला दहीहंडीला यंदा 'अवैध धंद्यांची दहीहंडी' असे स्वरूप देण्यात आले. ॲड. पंकज गोरे यांच्या वतीने दरवर्षी महिला दहीहंडीचे आयोजन करण्यात येते. या उत्सवाला केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक स्वरूप न देता सामाजिक विषयांची जोड देण्याचा प्रयत्न केला जातो. दहीहंडीसारख्या लोकप्रिय उत्सवाच्या माध्यमातून समाजातील ज्वलंत प्रश्न नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यंदाही करण्यात आला. अवैध धंद्यांमुळे तरुण पिढीचे होणारे नुकसान रोखणे, शहरातील वातावरण सुरक्षित ठेवणे आणि प्रशासनाने प्रभावी कारवाई करणे, हा या उपक्रमामागील मुख्य संदेश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. विद्यार्थिनींचा गौरव कार्यक्रमानंतर बर्वे कन्या छात्रालयाच्या विद्यार्थिनींना प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रद्धा पगार, मनीषा साळवे, अर्चना गोरे आणि सोनल गोरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी भगवा चौक गणेश मंडळाचे अध्यक्ष पंकज बारस्कर, प्रवीण मुर्तडक, विनोद रणमळे, आप्पा लहामगे, योगेश गोरे, सागर निकम, सागर साळवे, मयूर कुलकर्णी, निलेश चौधरी, गोकुळ येलमामे, स्वप्निल सोनवणे, ज्ञानेश्वर देवरे, दर्शन खंबायत, भावेश आहेरराव, सिद्धार्थ गोरे, जयवंत गोरे, विक्की गर्ग आदी उपस्थित होते.

# सोयगावसह तीन गावांत डेंग्यूचे पाच रुग्ण

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यात सध्या डेंग्यू, ताप, सर्दी-खोकला, उलटी आणि जुलाबाच्या आजारांनी नागरिक त्रस्त असल्याचे चित्र आहे. सोयगाव, आमखेडा आणि गलवाडा या तीन ठिकाणी डेंग्यूचे पाच रुग्ण आढळून आले असून ते सोयगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत आहेत, अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. धनाजी खंडारे यांनी दिली. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, तालुक्यातील अनेक गावांमध्ये अस्वच्छता, साचलेले पाणी आणि दुर्गंधीचे वातावरण असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून आरोग्य विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांनी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे. गावागावांत आजारांचे रुग्ण; दवाखान्यांमध्ये गर्दी तालुक्यातील विविध गावांमध्ये सर्दी, खोकला, ताप, उलटी आणि जुलाबाच्या तक्रारी असलेल्या रुग्णांची संख्या वाढल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. सोयगाव ग्रामीण रुग्णालयासह शहरातील खासगी दवाखान्यांमध्येही रुग्णांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र आहे. गावागावांत नियमित साफसफाई, नाल्यांची स्वच्छता आणि धूरफवारणी होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे डेंग्यूसह इतर साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोयगाव शहरात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर सोयगाव शहरात नाल्या तुंबणे, नाल्यांमध्ये दुर्गंधी असणे तसेच रस्त्याच्या कडेला कचरा साचणे अशा समस्या असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक ठिकाणी गाजर गवत व झुडपे वाढल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# सुनिल मंगरुळे यांना राज्यस्तरीय आदर्श अधिकारी पुरस्कार!

## उत्कृष्ट कार्याची शासनाकडून दखल

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षांसाठी राज्यस्तरीय आदर्श पंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सुनिल माणिकचंद मंगरुळे यांची सन २०२३-२४ या वर्षासाठीच्या राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सुनिल मंगरुळे यांच्या उल्लेखनीय कार्याची शासनस्तरावर दखल घेतली गेल्याने सोयगाव तालुक्यासह संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



विकासकामांना दिली गती जरंडी ग्रामपंचायतीत कार्यरत असताना सुनिल मंगरुळे यांनी विकासकामांना गती देतानाच विविध सामाजिक आणि लोकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविले. ग्रामपंचायतीला उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य व नियोजनबद्ध वापर, विकासकामांचे नियोजन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, पायाभूत सुविधा तसेच विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या नियोजनबद्ध आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे जरंडी ग्रामपंचायतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली. गावातील विकासकामांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणतानाच ग्रामस्थांचा सहभाग वाढविण्यासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले. लोकसहभागातून ग्रामविकासाला बळ विविध सामाजिक व विकासात्मक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामस्थांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाशी जोडण्यात आले. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना लोकसहभागाची जोड मिळाली आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाला अधिक लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले. जरंडी ग्रामपंचायतीने विकासाच्या विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे आदर्श ग्रामपंचायतीच्या स्पर्धेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कामगिरीची राज्यस्तरावर दखल घेत सुनिल मंगरुळे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यशवंत पंचायत राज अभियानातून गौरव यशवंत पंचायत राज अभियानाच्या पुरस्कार सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी व संबंधित घटकांचा शासनाच्या वतीने गौरव करण्यात येतो. याच अभियानांतर्गत सुनिल मंगरुळे यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

या पुरस्कारामुळे जरंडी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सुनिल मंगरुळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जरंडी ग्रामपंचायतीच्या विकासाला दिशा देणाऱ्या त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर झालेली दखल ही सोयगाव तालुक्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब ठरली आहे.

# विद्यार्थ्यांच्या यशाला दिले नव्या भरारीचे पंख; किरणकुमार पाटील यांची उपक्रमशील वाटचाल

## 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' उपक्रमात सोयगाव तालुक्यात द्वितीय

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत शिक्षणाची गुणवत्ता उंचावणारे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथील शिक्षक किरणकुमार वसंतराव पाटील हे उपक्रमशील व आदर्श शिक्षक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, वैज्ञानिक, पर्यावरणपूरक तसेच विविध स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' या उपक्रमात जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगावने तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळवत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीची दखल घेण्यास भाग पाडले आहे. विज्ञान प्रदर्शनात तालुक्यात प्रथम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रयोगशीलता निर्माण व्हावी, यासाठी शाळेत विविध प्रयोग व विज्ञानविषयक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. या प्रयत्नांचे फलित म्हणून विज्ञान प्रदर्शनात शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच



इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या यादीत शाळेचे दोन विद्यार्थी पात्र ठरले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेलाही चालना मिळत असल्याचे दिसून येते. ISRO सहल निवड चाचणीत तालुक्यात प्रथम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अवकाश विज्ञानाची गोडी आणि वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. याचाच परिणाम म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांनी ISRO सहल निवड चाचणीत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. या यशामुळे शाळेतील एका विद्यार्थीनीची ISRO सहलीसाठी निवड झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही विज्ञान आणि अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा या माध्यमातून मिळाली आहे. परसबाग उपक्रमातही प्रथम क्रमांक पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम निर्माण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या परसबाग उपक्रमात शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून साकारलेली ही परसबाग केवळ शोभेपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याचे प्रभावी माध्यम ठरली आहे. 'गड-किल्ले बनवा' उपक्रमातून इतिहासाची ओळख छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा इतिहास विद्यार्थ्यांना समजावा आणि आपल्या ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान निर्माण व्हावा, या उद्देशाने शाळेने 'गड-किल्ले बनवा' स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाळेच्या या उल्लेखनीय सहभागाची दखल घेत मुख्यमंत्र्यांकडून गौरवपत्र देऊन शाळेचा सन्मान करण्यात आला. शाळेच्या विकासाला बळ शाळेच्या विकासासाठी केवळ शासकीय मदतीवर अवलंबून न राहता लोकसहभागातून विविध शैक्षणिक आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी किरणकुमार पाटील यांनी पुढाकार घेतला.माजी विद्यार्थी आणि नागरिकांना शाळेशी जोडत शाळेच्या विकासाला लोकसहभागाची भक्कम साथ मिळवून देण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

# धरणगाव तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करा!

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव| प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यात गेल्या महिन्यापासून समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतीपिकांवर गंभीर परिणाम झाला असून तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपनेते गुलाबराव वाघ, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश चौधरी आणि शिवसेनेचे तालुकाप्रमुख जयदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि. ४ सप्टेंबर रोजी धरणगाव तहसील कार्यालयात तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात गेल्या महिन्यापासून पर्जन्यमान नसल्याने शेतपिके करपण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल व उद्विग्न झाला असून परिस्थिती गंभीर बनली आहे. पावसाअभावी गुराढोरांनाही पाण्याची टंचाई भासत असून त्यांच्या



चाऱ्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. चारा छावण्या उभारण्याची मागणी पशुधनासाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. शासनाच्या निकषानुसार २१ दिवसांचा पावसाचा खंड पडल्यास तातडीने उपाययोजना करण्यात येतात. मात्र, धरणगाव तालुक्यात परिस्थिती गंभीर असतानाही अद्याप आवश्यक उपाययोजना झालेल्या नसल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. दहा दिवसांत उपाययोजना न झाल्यास मोर्चा तालुक्यातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकरी व पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. येत्या दहा दिवसांत शासन व प्रशासनाने ठोस कारवाई केली नाही, तर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या वेळी जि.प. माजी उपाध्यक्ष जानकीराम पाटील, माजी सभापती दीपक सोनवणे, नगरसेवक भागवत चौधरी, लक्ष्मण माळी, परमेश्वर महाजन, सुनील चौधरी, किरण अग्निहोत्री, जितेंद्र धनगर, शेतकरी तालुकाप्रमुख विजय पाटील, युवासेना तालुकाप्रमुख स्वप्नील परदेशी, लिलाधर पाटील, नंदू पाटील, अरुण पाटील, गजानन महाजन, सुनील चव्हाण, प्रवीण पाटील, अक्षय मुथा, रियाझ बागवान, वसिम पिंजारी, प्रेमराज चौधरी, मेघनाथ ठाकरे,अरविंद चौधरी, शरद शिरसाठ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


# राजकुंवर महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**बनोटी। प्रतिनिधी:** देशाचे माजी राष्ट्रपती तथा भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त राजकुंवर महाविद्यालय, बनोटी येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून धीरजसिंग चव्हाण सर आणि पंकज पाटील सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रा. परमार सर होते. शिक्षकांच्या योगदानावर मान्यवरांचे मार्गदर्शन यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षकांचे समाजातील महत्त्वाचे योगदान, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे मार्गदर्शक असतात. विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीत शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्कार महत्त्वपूर्ण ठरतात, असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयीचा आदर आणि कृतज्ञता आपल्या मनोगत व विविध सादरीकरणातून व्यक्त केली. विद्यार्थिनी रुद्रानी विशाल चिकटे हिने कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. निलोफर मेहमूद शेख हिने आभार प्रदर्शन केले, तर शुभम राजू कुंटे याने मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला प्रा. एस. आर. सोळंके, प्रा. जी. पी. चौतमल, प्रा. एस. एन. सोळंके, प्रा. व्ही. आर. कऱ्हाळे, प्रा. बी. डी. खैरनार, प्रा. ए. आर. राजपूत, प्रा. एस. डी. महाले, प्रा. एन. एल. सोळंके, प्राध्यापिका एस. एस. मोहरे, प्रा. एम. व्ही. साबळे, प्रा. बी. व्ही. सोळंके, प्रा. एस. एन. खैरनार आदी प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते.

# "रस्त्यांवरील खड्ड्यांचे फोटो काढता, स्वतःच्या चेहऱ्यावरील खड्डेही बघा!




जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** धुळे शहरातील स्टेशन रोड चौकात आमदार अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या भव्य कान्हादेश शिल्पाचे अनावरण आमदार अनुप अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. या शिल्पामुळे स्टेशन रोड चौकाच्या सौंदर्यात भर पडली असून शहराच्या विकासाच्या दृष्टीने आणखी एका कामाची भर पडली आहे. या कार्यक्रमावेळी बोलताना आमदार अनुप अग्रवाल यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. "सट्ट्याच्या पेढ्या आजपासून सुरू झाल्या आहेत का?" असा सवाल करत त्यांनी गेल्या दीड वर्षात अवैध धंद्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्याचा दावा केला. "जेवढ्या कारवाया गेल्या दीड वर्षात झाल्या, तेवढ्या आजपर्यंत झाल्या नाहीत. या कारवाया आमच्या कार्यकाळात झाल्या आहेत, हे विरोधकांनी सांगायला हवे," असे म्हणत अग्रवाल यांनी विरोधकांना लक्ष्य केले. "खड्ड्यांचे फोटो काढून रील बनवण्यापेक्षा विकासकामेही पाहा" शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांवरून विरोधकांकडून होत असलेल्या टीकेलाही आमदार अग्रवाल यांनी प्रत्युत्तर दिले. "सध्या फक्त एखाद्या रस्त्यावरील खड्ड्याचा फोटो काढायचा आणि त्याची रील बनवायची. रस्त्यावरील खड्डे बघताना स्वतःच्या चेहऱ्यावरील खड्डेही बघून घ्या," असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला. शहरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून त्याकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. रावेरच्या वनजमिनीचे महसूलकडे हस्तांतरण यावेळी आमदार अग्रवाल यांनी रावेर येथील वनविभागाच्या जमिनीच्या हस्तांतरणाबाबतही महत्त्वाची माहिती दिली. वनविभागाची जमीन महसूल विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असून त्याबाबतचे गॅझेटही सरकारकडून काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रक्रियेमुळे रावेर येथे लवकरच मोठ्या एमआयडीसीच्या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती अग्रवाल यांनी दिली. तसेच धुळे शहरातील विविध भागांत सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम वादात

## रहिवाशांचा रस्ता बंद होत असल्याचा आरोप; अधिकाऱ्यांकडून पाहणी करून न्याय देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**पिंप्री (माळेगाव) । प्रतिनिधी :** पिंप्री (माळेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असून, या बांधकामामुळे स्थानिक रहिवाशांच्या ये-जा करण्याच्या मार्गास अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार समोर आली आहे. यासंदर्भात संजय बाबुलाल परदेशी व गावकरी मंडळी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे लेखी अर्ज करून बांधकामाची पाहणी करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामास त्यांचा कोणताही विरोध नाही. मात्र, शाळेचे चार कॉलम नमुना क्रमांक ८च्या क्षेत्रफळाच्या बाहेर घेऊन बांधकाम करण्यात येत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित रहिवाशांच्या घराकडे जाण्या-येण्याचा मार्ग बाधित होत असून बाजूच्या गल्लीतील नागरिकांनाही ये-जा करण्यासाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. शाळेचे बांधकाम नमुना क्रमांक ८च्या जागेतच करण्याची मागणी शाळेचे बांधकाम नमुना क्रमांक ८मध्ये असलेल्या जागेच्या हद्दीतच करण्यात यावे, अशी मागणी



अर्जदाराने केली आहे. त्यामुळे रहिवाशांचा वापराचा मार्ग बंद होणार नाही आणि बाजूच्या गल्लीतील नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोकळा व सुरळीत रस्ता उपलब्ध राहील, असे अर्जात म्हटले आहे. सध्या सुरू असलेल्या बांधकामामुळे आपल्या कुटुंबाला घराकडे ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होत असल्याचेही अर्जदाराने नमूद केले आहे. "घराकडे सरकून बांधकाम" केल्याचा आरोप हे बांधकाम जाणूनबुजून आपल्या घराच्या दिशेने सरकवून केले जात असल्याचा आरोपही अर्जदाराने केला असून, यामागे हेतुपुरस्सर कारण असल्याचा संशय व्यक्त केला आहे. मात्र, या आरोपांबाबत संबंधित बांधकाम यंत्रणा किंवा प्रशासनाची बाजू अद्याप समोर आलेली नाही. जुन्या शाळेच्या पाठीमागून रस्ता न काढता तो समोरील बाजूने काढण्यात यावा आणि घराकडे जाण्यासाठी आपला रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणीही अर्जदाराने केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणीची मागणी सदर प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून बांधकामाची हद्द, रस्त्याची स्थिती आणि रहिवाशांच्या ये-जा करण्याच्या मार्गाबाबत वस्तुस्थिती तपासावी. त्यानंतर योग्य तो न्याय द्यावा, अशी विनंती अर्जदाराने केली आहे. या अर्जाच्या प्रती सरपंच व ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मालेगाव-पिंप्री, गटशिक्षण अधिकारी सोयगाव, तहसीलदार सोयगाव तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोयगाव यांना देण्यात आल्या आहेत. या प्रकरणात प्रशासनाकडून प्रत्यक्ष पाहणी व चौकशी झाल्यानंतरच बांधकामाची हद्द आणि रहिवाशांच्या रस्त्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा; अहवाल तयार करण्याचे निर्देश

## पावसातील खंड, पिकांची स्थिती आणि जलसाठ्यांचा अभ्यास करून शासनाकडे अहवाल सादर करणार

जन सम्राट टाईम्स

**परभणी । प्रतिनिधी:** जिल्ह्यात जून-जुलै महिन्यातील पावसाची स्थिती, पावसाचे दिवस, प्रत्यक्ष पर्जन्यमान तसेच ऑगस्ट महिन्यातील पावसाचा पूर्ण खंड यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून अभ्यासपूर्ण अहवाल तयार करावा. शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळावा, यासाठी हा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीत जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती, पिकांची अवस्था, उपलब्ध जलसाठे आणि सिंचन व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पावसातील खंडाचा शास्त्रीय अभ्यास करण्याचे निर्देश जिल्ह्यात ३० जुलै रोजी झालेला अतिवृष्टीचा पाऊस वगळता जून-जुलै कालावधीत समाधानकारक पाऊस झालेला नसल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. पावसातील मोठा खंड, प्रत्यक्ष पर्जन्यमान आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम यांचा अभ्यास करून दुष्काळसदृश परिस्थितीचा अहवाल तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सध्या काही प्रमाणात उभी असलेली पिके प्रामुख्याने संरक्षित सिंचनामुळे टिकून असली, तरी पावसातील खंडामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. पिके संवेदनशील अवस्थेत असताना पावसाअभावी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याचे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले. सध्याच्या हंगामात २.५ ते ५ मिमी झालेला पाऊसदेखील पावसाचा खंड मानण्याबाबत विचार करावा, असेही त्यांनी सूचित केले. ३० जुलै




रोजी झालेला अतिवृष्टीचा पाऊस पिकांसाठी पुरेसा परिणामकारक ठरला नाही, त्यामागील शास्त्रीय कारणांचाही अहवालात समावेश करावा, असे निर्देश त्यांनी दिले. कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाची मदत घेणार पावसातील मोठा खंड गृहीत धरून समितीने संयुक्तपणे अहवाल तयार करावा. त्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाची मदत घ्यावी, अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली. पावसाची शास्त्रीय आकडेवारी, पिकांची सद्यस्थिती आणि पावसातील खंड याबाबत आवश्यक माहिती संकलित करून शासनाकडे अहवाल सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. खरिपाची पिके वाचविण्यास प्रशासनाचे प्राधान्य सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामापेक्षा उभी असलेली खरिपाची पिके वाचविण्यास जिल्हा प्रशासनाचे प्राधान्य राहणार आहे.

जलसंपदा विभागाच्या वितरिकांमधून आवश्यकतेनुसार पाणी सोडण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जायकवाडी, येलदरी, निम्न दुधना आणि करपरा प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा आवश्यकतेनुसार उपयोग करून खरिपाची पिके वाचविण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. नदीकाठच्या गावांमध्ये सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच पाणी उपसण्यासाठी आवश्यक वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही आदेश काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन दुष्काळाची संभाव्य परिस्थिती लक्षात घेता महसूल, कृषी, जलसंपदा, जलसंधारण, भूजल सर्वेक्षण व विकास, पाणीपुरवठा तसेच संबंधित विभागांनी योग्य समन्वय साधून एकत्रित प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी संगिता चव्हाण, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. चक्रधर चव्हाण, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत, तालुका कृषी अधिकारी मुंजाजी धोत्रे, लघुपाटबंधारे विभागाचे गणेश अदमनकर, डॉ. मनोज घाटे, ए. एम. वाघ, गणपत के. शिंदे, रा. चं. मोरे तसेच जलसंपदा, कृषी व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळावा आणि सध्याची खरिपाची पिके वाचविता यावीत, यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केले. जिल्ह्यात जून-जुलै महिन्यातील पावसाची स्थिती, पावसाचे दिवस, प्रत्यक्ष पर्जन्यमान तसेच ऑगस्ट महिन्यातील पावसाचा पूर्ण खंड यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून अभ्यासपूर्ण अहवाल तयार करावा. शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळावा, यासाठी हा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणा विरोधात जळगावात 'महामोर्चा'




जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या (SC) आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाविरोधात राज्यभरात असंतोष व्यक्त होत असताना, या निर्णयाच्या विरोधात जळगाव जिल्ह्यात ४ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य 'महामोर्चा' काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हा महामोर्चा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी लोकसंघर्ष कृती समितीच्या वतीने देण्यात आली. या महामोर्चाला प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मंत्री बबनराव घोलप, विद्यमान खासदार व माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे तसेच ॲड. अमन आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. महामोर्चाच्या पूर्वतयारीसाठी ६ सप्टेंबरला बैठक ४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महामोर्चाची व्यापक रूपरेषा, नियोजन आणि जनसंपर्क अभियान निश्चित करण्यासाठी रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता पद्मालय विश्रामगृह, जळगाव येथे जिल्हास्तरीय विशेष नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत महामोर्चाच्या आयोजनाबाबत विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील रणनीती निश्चित केली जाणार आहे. 'घटनात्मक हक्क कमकुवत करण्याचा प्रयत्न' असा आरोप अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून समाजातील ऐक्याला बाधा आणण्याचा आणि घटनात्मक हक्क कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. या भूमिकेच्या निषेधार्थ ४ ऑक्टोबरच्या महामोर्चात जळगाव जिल्ह्यातील विविध भागांतून समाजबांधव, चळवळीतील कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे समितीने म्हटले आहे. सर्व घटकांना नियोजन बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन महामोर्चा यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि समाजबांधवांनी ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या नियोजन बैठकीस वेळेवर व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# बोरअजंटी आश्रमशाळेत शिक्षक दिन व दहीहंडीचा जल्लोष!

## गोविंदा पथकाने थरारक मानवी मनोरा रचत फोडली दहीहंडी

जन सम्राट टाईम्स



**बोरअजंटी, ता. चोपडा । प्रतिनिधी:** ढोल-ताशांचा निनाद, 'गोविंदा आला रे...'चा उत्साहपूर्ण जयघोष, लेझीमच्या तालावर थिरकणारी पावले आणि विद्यार्थ्यांचा जल्लोष अशा उत्साहपूर्ण वातावरणात धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी येथे शिक्षक दिनासह श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र रायसिंग भादले आणि सचिव श्री. ज्ञानेश्वर रायसिंग भादले यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. धनंजय रायसिंग भादले आणि संचालक श्री. जितेंद्र रायसिंग भादले यांच्या हस्ते श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडीचे विधिवत पूजन करण्यात आले. श्रीकृष्णाच्या बालरूपाचे पूजन करून उपस्थितांनी भक्तिभावाने जन्माष्टमी उत्सवाचा आनंद घेतला. दहीहंडीचा थरार; मानवी मनोरा ठरला आकर्षण पूजनानंतर दहीहंडी उत्सवाला सुरुवात झाली. उत्सवातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या गोविंदा पथकाने एकजूट, धाडस आणि संघभावनेचे दर्शन घडवत थरावर थर रचून मानवी मनोरा उभारला. विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आणि गोविंदा पथकाने दहीहंडी फोडली.

दहीहंडी फुटताच विद्यार्थ्यांनी केलेला जल्लोष आणि उपस्थितांच्या टाळ्यांचा कडकडाट यामुळे संपूर्ण शाळा परिसर उत्साहाने दुमदुमून गेला. लेझीम पथकाच्या सादरीकरणाने रंगली मैफल कार्यक्रमाची रंगत वाढविणारे आणखी एक आकर्षण म्हणजे आश्रमशाळेच्या लेझीम पथकाचे दमदार सादरीकरण. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर आकर्षक नृत्य सादर केले.

तालबद्ध हालचाली, शिस्तबद्ध संचलन आणि आत्मविश्वासपूर्ण सहभागामुळे लेझीम पथकाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांची कृतज्ञता शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ज्ञानदानासोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे, संस्कार घडविणे आणि जीवनाला योग्य दिशा देणे, हे शिक्षकांचे महत्त्वपूर्ण कार्य असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

---

# पी. डी. पाटील यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

## शिक्षक दिनानिमित्त काँग्रेस भवनात २५ गुरुजनांचा सन्मान

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव। (प्रतिनिधी):** शहरातील सुवर्णमहोत्सवी महात्मा फुले हायस्कूलचे आदर्श शिक्षक पी. डी. पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेत जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून जळगाव येथील काँग्रेस भवनात जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आदर्श शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात जळगाव जिल्ह्यातील एकूण २५ शिक्षकांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये धरणगाव येथील महात्मा फुले हायस्कूलचे शिक्षक पी. डी. पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. अशोक भालेराव होते. प्रमुख अतिथी म्हणून भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे भाचे योगेंद्रसिंग पाटील, प्रदेश सचिव प्रवीण सुरवाडे, काँग्रेसचे सरचिटणीस मुक्ती हरुण, ओबीसी प्रदेशाध्यक्ष अशोक खलाणे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय महाजन, विजय कोसोदे, माजी शहराध्यक्ष शामभाऊ तायडे, विजय वाणी, श्रीधर चौधरी, डॉ. एस. एस. राणे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष किरण महाजन, काँग्रेसचे माजी सचिव ॲड. सलीम पटेल तसेच एस.सी. सेल अध्यक्ष अंकुश कटारे आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कारांची यशस्वी वाटचाल पी. डी. पाटील यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची यापूर्वीही विविध संस्थांनी दखल घेतली आहे. त्यांना सामाजिक-शैक्षणिक संघटनांकडून राज्यस्तरीय तीन, खान्देशस्तरीय दोन, जिल्हास्तरीय चार आणि तालुकास्तरीय पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच तहसील कार्यालय, धरणगाव यांच्याकडून त्यांना पाच वेळा उत्कृष्ट बीएलओ पुरस्कार मिळाला आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर पी. डी. पाटील यांनी, "पुरस्काराने ऊर्जा मिळते आणि काम करण्याची जबाबदारी वाढते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे हेच माझे कर्तव्य आहे," अशी भावना व्यक्त केली.

---

# 'सर-मॅडम'ची भूमिका दहावीकरांच्या हाती; आदर्श विद्यालयात शिक्षक दिनाची पर्वणी

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** शिक्षक दिनाचे औचित्य साधून धरणगाव येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात यंदा आगळ्यावेगळ्या उपक्रमातून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. नेहमी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी एका दिवसासाठी 'सर-मॅडम'ची भूमिका स्वीकारत विद्यालयाचा संपूर्ण शैक्षणिक कारभार सांभाळला. विद्यार्थ्यांनी दिवसभर विविध वर्गांमध्ये अध्यापन करण्यासोबतच शिस्त, नियोजन आणि इतर शैक्षणिक जबाबदाऱ्या पार पाडल्या. शिक्षक म्हणून वर्गासमोर उभे राहताना विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य आणि नियोजन क्षमता प्रकर्षाने दिसून आली. शिक्षक होणे म्हणजे जबाबदारीची जाणीव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे होते.

तर आदर्श विद्यालयाचे संचालक तथा उपशिक्षक आशिषकुमार पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून वर्गासमोर उभे राहत प्रभावीपणे अध्यापन केले. दिवसभर शिक्षकांच्या जबाबदाऱ्या पार पाडताना शिक्षक होणे म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक शिकविणे नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी घेणे आहे.

याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. शिक्षक दिनानिमित्त हर्षदा पाटील, लक्ष्मी सपकाळे, रिया देसले, हर्षदा भोई, गोविंदा पाटील व दिव्या गव्हाणे यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. उपशिक्षक बाबाजी मासुळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांचे कार्य, शिस्त, संस्कार तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील शिक्षकांची भूमिका याबाबत विचार मांडले. 'गुरू-शिष्य परंपरा' जपण्याचे आवाहन अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे यांनी भारतीय गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून ते संस्कार, विश्वास आणि मार्गदर्शनावर आधारित असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका प्रत्यक्ष अनुभवणे हा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचेही त्यांनी नमूद केले.

---

# चौगाव किल्ल्याचे एक हजार वर्षांनंतर होणार संयुक्त सर्वेक्षण!

## आ. चंद्रकांत सोनवणे यांच्या पत्राची दखल; पुरातत्व, वन, महसूल व भूमी अभिलेख विभागाकडून पाहणी

जन सम्राट टाईम्स

**चोपडा प्रतिनिधी:** जळगाव : चोपडा तालुक्यातील मौजे चौगाव येथील पुरातन ऐतिहासिक चौगाव (विजयगड) किल्ल्याचा राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीत समावेश करण्याच्या मागणीला आता गती मिळाली आहे. आमदार प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे यांनी याबाबत ६ ऑगस्ट २०२६ रोजी संबंधित कार्यालयाकडे पत्राद्वारे मागणी केली होती.

या पत्राची दखल घेत आता चौगाव किल्ल्याचे पुरातत्व, वन, महसूल आणि भूमी अभिलेख विभागामार्फत संयुक्त सर्वेक्षण करण्यात येणार आहे. चौगाव किल्ल्याच्या परिसरात सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीच्या



सातवाहनकालीन वारशाच्या खुणा व लेणी असल्याचे आमदार सोनवणे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. किल्ल्याच्या परिसरात नैसर्गिक लेणी, पाण्याच्या टाक्या, पुरातन नंदीचे हेमाडपंथी मंदिराचे अवशेष, सप्ततलाव समूह, गवळीवाड्यातील खोल्या तसेच पुरातन आई भवानी मंदिर आढळते. भव्य तटबंदी, बुरुज आणि भुयारी मार्गामुळे ऐतिहासिक महत्त्व चौगाव किल्ल्याची भव्य व मजबूत तटबंदी, दोन प्रवेशद्वारे, अनेक बुरुज तसेच भुयारी मार्ग यामुळे या गडाला ऐतिहासिक आणि स्थापत्यदृष्ट्या विशेष महत्त्व असल्याचे आमदार सोनवणे यांनी म्हटले आहे. किल्ल्यालगतच्या त्रिवेणी संगम परिसरात श्री महादेव मंदिर, उत्तर मराठा राजवटीशी संबंधित अवशेष तसेच अन्य ऐतिहासिक वास्तूंच्या खुणाही आढळतात. चौगाव किल्ल्याचा उल्लेख ब्रिटिशकालीन राजपत्रांमध्ये १८१८ ते १८८० या कालखंडात तसेच महाराष्ट्र राज्याच्या जळगाव गॅझेटमध्ये असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्याची मागणी जिल्ह्यातील असंरक्षित ऐतिहासिक स्मारकांचे सर्वेक्षण करून त्यांचा राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीत समावेश करण्याचे आदेश ७ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महावारसा समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तात नमूद असल्याने चौगाव किल्ल्याचाही या प्रक्रियेत समावेश करावा, अशी मागणी आमदार सोनवणे यांनी केली होती. चौगाव किल्ला यावल वनविभागातील चोपडा तालुक्यातील कक्ष क्रमांक २५८ मध्ये येतो. वन विभागाच्या हद्दीतील सालेर, मुल्हेर व वासोटा किल्ल्यांच्या धर्तीवर चौगाव किल्ल्यालाही राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यात यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. महसुली माहिती प्राप्त; आता संयुक्त सर्वेक्षण आमदारांच्या पत्राची दखल घेत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी यावल वन विभागाचे उपवनसंरक्षक सौरिष सहाय्य आणि नाशिक विभागीय पुरातत्व अधिकारी अमोल गोटे यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार नाशिक विभागीय पुरातत्व अधिकारी अमोल गोटे यांनी अधीक्षक भूमी अभिलेख, चोपडा, तहसीलदार चोपडा आणि वनक्षेत्रपाल चोपडा यांच्याकडून चौगाव किल्ल्याची महसुली माहिती मागविली होती. ही माहिती गेल्या आठवड्यातच नाशिक विभागीय पुरातत्व कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहे.

---

# वर्गखोलीत शिरला धामण; विद्यार्थी दुसऱ्या वर्गात, मोठा अनर्थ टळला!

जन सम्राट टाईम्स

**बोदवड| प्रतिनिधी :** नाडगाव येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वर्गखोलीत धामण जातीचा साप शिरल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, याचवेळी शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम सुरू असल्याने सर्व विद्यार्थी दुसऱ्या वर्गखोलीत उपस्थित होते. त्यामुळे साप शिरलेल्या वर्गात एकही विद्यार्थी नसल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळला. शाळेच्या वर्गखोलीशेजारी असलेल्या धर्मशाळेसमोरील झाडावरून साप खाली पडला.


पोषण आहार शिजविणाऱ्या वैशाली ताई पाटील यांच्या निदर्शनास हा साप आल्यानंतर त्यांनी आरडाओरड केली. त्यानंतर शाळेतील शिक्षक महेंद्र पाटील, गोवर्धन सर तसेच शेजारील के. जी. पाटील हायस्कूलचे शिक्षक अंकित पाटील, कल्याण पाटील, कर्मचारी अनिल पौळ, सुरेश प्रजापती आणि नरेंद्रसिंग पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत साप वर्गखोलीत शिरला होता. दरम्यान, शाळेत बाल विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी दुसऱ्या वर्गखोलीत असल्याने साप शिरलेल्या खोलीत कोणताही विद्यार्थी उपस्थित नव्हता. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच शिक्षक महेंद्र पाटील व अंकित राजपूत यांनी सर्पमित्रांशी संपर्क साधला.

शिवसैनिक अमोल व्यवहारे यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी शिरसाळा येथील सर्पमित्र समाधान गोसावी यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच गोसावी यांनी वेळ न दवडता नाडगावकडे रवाना होत अवघ्या २० मिनिटांत शाळेत पोहोचून सापाचा सुरक्षितपणे रेस्क्यू केला. रेस्क्यू करण्यात आलेला साप धामण जातीचा असून तो बिनविषारी असल्याची माहिती सर्पमित्र समाधान गोसावी यांनी दिली.

# अजिंठा लेणी : डोंगराच्या काळोखात लपलेलं 2,000 वर्षांचं रहस्य!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** कल्पना करा... की, तुम्ही जवळपास २,००० वर्षांपूर्वीच्या एका दगडी डोंगरासमोर उभे आहात तुमच्या हातात आधुनिक मशीन नाही वीज नाही,क्रेन नाही,कॉम्प्युटर नाही पण समोरचा अख्खा डोंगर आतून कोरून तयार केलेलं एक भव्य जग आहे भिंतींवर राजे-राण्या आहेत,बुद्धांच्या पूर्वजन्मांच्या कथा आहेत, अद्भुत चित्रे आहेत, शेकडो वर्षांपूर्वीच्या कलाकारांचे चेहरे आजही रंगांमध्ये जिवंत आहेत आणि सर्वात मोठं रहस्य हे सगळं नेमकं कसं निर्माण झालं असेल? ही आहे महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जगप्रसिद्ध अजिंठा लेणी कथा सुरू होते... सुमारे २,००० वर्षांपूर्वी! वाघूर नदीच्या घोड्याच्या नालासारख्या वळणाभोवती असलेल्या डोंगराच्या कड्यांमध्ये प्राचीन कारागिरांनी दगड फोडत-फोडत गुहा निर्माण करण्यास सुरुवात केली. अजिंठ्याचा पहिला मोठा टप्पा साधारणपणे इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून सुरू झाला. त्या काळात येथे बौद्ध भिक्षू येत असत. पावसाळ्यात भ्रमंती थांबवून भिक्षूंना राहता यावं, ध्यान करता यावं आणि धार्मिक शिक्षण देता यावं म्हणून येथे विहार आणि चैत्यगृहे तयार करण्यात आली. पण काही काळानंतर या परिसरातील काम थांबले...आणि मग अनेक शतकांसाठी अजिंठा जणू काळाच्या पडद्याआड गेला. आणि मग आला अजिंठ्याचा सुवर्णकाळ... इ.स.च्या पाचव्या-सहाव्या शतकात वाकाटक राजवंशाच्या काळात, विशेषतः राजा हरिषेणाच्या कारकिर्दीत, अजिंठ्यात मोठ्या प्रमाणावर लेणी, शिल्पे आणि चित्रांची निर्मिती झाली. राजाश्रयाबरोबरच सरदार, मंत्री, व्यापारी आणि इतर दात्यांनीही या कामाला मदत केली. याच काळात अजिंठ्याच्या अनेक भव्य लेण्यांनी आज आपण पाहतो ते अद्भुत रूप धारण केलं. आणि मग पुन्हा इतिहास बदलला,राजकीय परिस्थिती बदलली,अजिंठ्याचा परिसर हळूहळू निर्जन झाला,भिक्षू गेले,लोक गेले, आणि निसर्गाने आपल्या हिरव्या पडद्याने या संपूर्ण कलाविश्वाला झाकून टाकलं. शेकडो वर्षे... आणि एक शिकारी! इ.स. १८१९.ब्रिटिश अधिकारी जॉन स्मिथ अजिंठ्याच्या परिसरात वाघाच्या शिकारीसाठी आला होता. घनदाट जंगलातून जात असताना त्याची नजर डोंगराच्या कड्यातील एका अनोख्या कमानीसारख्या रचनेकडे गेली. कुतूहल म्हणून तो त्या दिशेने गेला,आत प्रवेश केला, आणि त्याच्यासमोर उलगडलं शतकानुशतके अंधारात लपलेलं एक अद्भुत कलाविश्व तो भाग आज लेणी क्रमांक १० म्हणून ओळखला जातो. जॉन स्मिथने तिथे आपले नाव आणि १८१९ ही तारीख कोरली. आजही त्या घटनेची खूण तिथे दिसते. मात्र एक महत्त्वाची गोष्ट— अजिंठ्याचा शोध जॉन स्मिथने "पहिल्यांदा" लावला असे म्हणणे पूर्णपणे अचूक नाही. स्थानिक लोकांना या लेण्यांची माहिती असण्याची शक्यता होती. १८१९ मध्ये ब्रिटिश जगाला या स्थळाची पुन्हा ओळख झाली, म्हणून याला "पुनर्शोध" (rediscovery) म्हणणे अधिक योग्य ठरते. पण अजिंठ्याचं खरं रहस्य इथे सुरू



होतं... या दगडी भिंतींवर इतकी सुंदर चित्रे कशी तयार झाली? आज आपण ब्रश, रंग, डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक प्रकाशयंत्रे वापरतो. पण त्या काळात कलाकारांनी उपलब्ध नैसर्गिक खनिजे आणि इतर पदार्थांपासून रंग तयार केले. भिंतींवर आधी प्लास्टरसदृश थर तयार करून त्यावर रंगकाम करण्यात आलं, आणि आश्चर्य म्हणजे...सुमारे १५०० ते २००० वर्षांनंतरही अनेक चित्रांचे रंग आणि रेषा आज आपल्याला स्पष्टपणे दिसतात ही चित्रे केवळ सजावट नव्हती, ती होती ,कथा धर्म राजदरबार तत्कालीन समाजजीवन वस्त्रे व अलंकार संगीत मानवी भावना यांचं दगडावर आणि रंगांमध्ये जतन केलेलं एक प्राचीन दृश्यविश्व पद्मपाणी... त्या चेहऱ्यात इतकी करुणा का दिसते? अजिंठा लेणी क्रमांक १ मधील बोधिसत्त्व पद्मपाणी हे जगप्रसिद्ध चित्रांपैकी एक आहे,हातात कमळ, डोळ्यांत शांतता, चेहऱ्यावर करुणा, आणि आजूबाजूला राजेशाही वैभव, पद्मपाणी आणि वज्रपाणी यांसारख्या बोधिसत्त्वांच्या प्रतिमा बौद्ध परंपरेतील करुणा, आध्यात्मिक आदर्श आणि संरक्षणाच्या संकल्पनांशी जोडलेल्या आहेत. हे चित्र पाहताना एक क्षण असा येतो की आपण चित्र पाहतोय की १,५०० वर्षांपूर्वीचा एखादा जिवंत चेहरा आपल्याकडे पाहतोय? आणि मग उलगडतात जातक कथा... अजिंठ्यात बुद्धांच्या पूर्वजन्मांच्या कथा सांगणाऱ्या अनेक जातक कथांचे चित्रण आहे.महाजनक जातक छदंत जातक शिबी जातक या कथांमध्ये त्याग, करुणा, दान, संयम आणि नैतिकतेचे संदेश आहेत. विशेष म्हणजे त्या चित्रांमध्ये केवळ धार्मिक प्रसंग नाहीत, त्यातून आपल्याला प्राचीन भारतातील राजदरबार राजवाडे दागिने कपडे वाद्ये हत्ती घोडे सामान्य माणसांचे जीवन यांचीही झलक मिळते,म्हणजेच...अजिंठा ही फक्त लेण्यांची मालिका नाही; ती प्राचीन भारताचा एक जिवंत चित्रपट आहे! आता येते अजिंठ्याची सर्वात रोमांचक लोककथा... कल्पना करा..रात्र झाली आहे. डोंगर काळोखात बुडाला आहे. वाघूर नदीचा आवाज घुमतोय...आणि या निर्जन डोंगरात अचानक कुठूनतरी हातोड्याचे आवाज ऐकू येतात... ठक्... ठक्... ठक्... लोककथांमध्ये अशी कल्पना सांगितली जाते की एवढ्या कठीण दगडात इतकी भव्य कलाकृती सामान्य माणसाने निर्माण केली असावी, यावर लोकांचा विश्वास बसत नव्हता. म्हणून काही स्थानिक कथांमध्ये या लेण्या दैवी किंवा अलौकिक शक्तींनी निर्माण केल्याच्या कल्पना आढळतात. कुठे गंधर्वांचा उल्लेख... कुठे देवशक्तींचा...तर कुठे "एका रात्रीत हे काम पूर्ण झालं" अशी अतिशयोक्त लोककथा पण... हा भाग इतिहास नाही—लोककथा आहे. पुरातत्त्वीय पुरावे मात्र सांगतात की अजिंठ्याची निर्मिती अनेक टप्प्यांत, अनेक वर्षांच्या मानवी श्रमातून झाली.आणि कदाचित... याच वास्तवामुळे ही कथा अधिक रोमांचक बनते. कारण अलौकिक शक्ती नसतानाही हजारो वर्षांपूर्वीच्या मानवाने जे निर्माण केलं...ते आजही आपल्याला थक्क करतं! डोंगर उलटा कोरला... पण कसा? अजिंठ्यातील लेणी बेसाल्ट खडकात कोरलेली आहेत..त्या स्वतंत्र दगडांनी बांधलेल्या इमारती नाहीत. म्हणजे कारागिरांनी दगड आणून इमारत उभी केली नाही...तर डोंगरच कापून इमारत निर्माण केली चैत्यगृहे... स्तंभ...मूर्ती...कमानी...विहार... आणि सूक्ष्म कोरीव काम! हे सर्व करण्यासाठी प्राचीन कारागिरांना असंख्य तास, प्रचंड कौशल्य आणि अचूक नियोजन करावं लागलं असणार. जगाने मान्य केलेलं अजिंठ्याचं वैभव! अजिंठा लेणी आज जगातील सर्वात महत्त्वाच्या प्राचीन बौद्ध कला-वास्तूंपैकी एक मानली जातात.इ.स. १९८३ मध्ये UNESCO ने अजिंठा लेण्यांना World Heritage Site म्हणून घोषित केलं.आणि म्हणूनच— महाराष्ट्रातील हा डोंगर फक्त महाराष्ट्राचा नाही फक्त भारताचा नाही तर संपूर्ण मानवजातीच्या सांस्कृतिक वारशाचा भाग आहे. पण एक प्रश्न अजूनही मनात राहतो... ज्या कलाकारांनी हे चित्र रंगवलं... ज्यांनी दगडात हे स्तंभ कोरले... ज्यांनी बुद्धांच्या कथा भिंतींवर जिवंत केल्या...त्यांची नावं आपल्याला किती माहिती आहेत?कदाचित... नाही त्यांची नावं इतिहासाने विसरली. पण त्यांनी निर्माण केलेली कला? ती १,५००–२,००० वर्षांनंतरही जगाशी संवाद साधते आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## शिक्षक दिनी विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका!



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत संपूर्ण दिवसभराचे शालेय कामकाज उत्साहात सांभाळले. इयत्ता नववी, दहावी तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून आपल्या शिक्षकांप्रमाणे अध्यापनाचे कार्य केले. या अभिनव उपक्रमात शाळेतील ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थी मुख्याध्यापिका म्हणून श्रुती कोष्टी, उपमुख्याध्यापक म्हणून कृतिका राऊत, तर पर्यवेक्षक म्हणून चिराग झटके यांनी जबाबदारी पार पाडली.

विद्यार्थ्यांनी मांडले शिक्षक बनण्याचे अनुभव दिवसभर शिक्षकांची भूमिका बजावल्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांनी आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. शिक्षक म्हणून अध्यापन करताना आलेल्या अडचणी, विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याची पद्धत आणि शिक्षकांची जबाबदारी याची प्रत्यक्ष अनुभूती मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष तथा कार्याध्यक्ष योगेश पाटील होते. श्री. डी. एन. पाटील यांनी संपूर्ण दिवसभराच्या शालेय कामकाजाचे निरीक्षण करून आपले मनोगत व्यक्त केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका एस. ए. बनसोडे यांनी विद्यार्थ्यांनी राबविलेल्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून त्यांना शाबासकी दिली. यावेळी शाळेचे ज्येष्ठ संचालक श्री. जनार्दन माडी, ॲड. प्रदीप देशपांडे, उपमुख्याध्यापक श्री. ए. डी. चौधरी आणि पर्यवेक्षक श्री. एस. एन. पाचपांडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार शिक्षक दिनानिमित्त नशिराबाद शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारल्यामुळे त्यांना शिक्षकांच्या जबाबदारीची जाणीव झाली, तसेच शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी-शिक्षिका सारंगी नारखेडे, प्रिया कोष्टी, श्रावणी राखुंडे आणि टीना धांडे यांनी केले. यज्ञेश टेमकर यांनी आभार मानले. येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत संपूर्ण दिवसभराचे शालेय कामकाज उत्साहात सांभाळले.

इयत्ता नववी, दहावी तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून आपल्या शिक्षकांप्रमाणे अध्यापनाचे कार्य केले. या अभिनव उपक्रमात शाळेतील ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थी मुख्याध्यापिका म्हणून श्रुती कोष्टी, उपमुख्याध्यापक म्हणून कृतिका राऊत, तर पर्यवेक्षक म्हणून चिराग झटके यांनी जबाबदारी पार पाडली.

---

## नाहाटा महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त प्राध्यापकांचा गुणगौरव

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** येथील नाहाटा महाविद्यालयात स्टाफ अकॅडमी आणि स्टाफ अँड स्टुडंट्स वेल्फेअर कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनानिमित्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मोहनभाऊ फालक होते. यावेळी चेअरमन श्री. महेशभाऊ फालक, कोषाध्यक्ष श्री. संजयकुमारजी नाहाटा, प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे, उपप्राचार्य डॉ. दीपक पाटील, उपप्राचार्य डॉ. जी. आर. वाणी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. वाय. एम. पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी मागील वर्षात पीएच. डी., नेट-सेट, पेटंट तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित करून शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संचालक मंडळातर्फे गौरव करण्यात आला. आधुनिक युगात शिक्षकांची जबाबदारी महत्त्वाची



५ सप्टेंबर हा भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. रश्मी शर्मा यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर तसेच आधुनिक युगातील शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी काव्याच्या माध्यमातून 'आदर्श शिक्षक कसा असावा' यावरही भाष्य केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहनभाऊ फालक यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत डिजिटल युगातील शिक्षकांची वाढती जबाबदारी अधोरेखित केली. तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळात शिक्षकांनी ज्ञान, मूल्ये आणि संस्कार यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना घडविण्याची भूमिका बजावावी, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ अकॅडमी समितीचे प्रमुख प्रा. डॉ. एस. टी. धूम यांनी केले. सूत्रसंचालन पी. ए. अहिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रफुल्ल इंगोले यांनी केले. गुणगौरव यादीचे वाचन डॉ. मनोज कुमार जाधव व डॉ. ममता पाटील यांनी केले. समिती सदस्यांचे परिश्रम कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन प्रबंधक श्री. भगवान तायडे व कार्यालयीन अधीक्षक श्री. सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्टाफ अकॅडमी आणि स्टाफ अँड स्टुडंट्स वेल्फेअर कमिटीच्या डॉ. एस. के. राठोड, डॉ. सचिन येवले, डॉ. गौरी पाटील, डॉ. जितेंद्र आडोकार, प्रा. सुनील अडकमोल, डॉ. किरण वारके यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सन्मानामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे आणि प्रेरणादायी वातावरण लाभले.

---

## महात्मा फुले हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात; दहावीच्या विद्यार्थ्यांनी सांभाळला शाळेचा कारभार

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव : प्रतिनिधी ।** शहरातील सुवर्णमहोत्सवी महात्मा फुले हायस्कूल येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी एका दिवसासाठी शाळेचा संपूर्ण कारभार सांभाळला. मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षिका तसेच सेवक अशा विविध भूमिका विद्यार्थ्यांनी जबाबदारीने पार पाडत प्रत्यक्ष शालेय व्यवस्थापनाचा अनुभव घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जया सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थिनी मुख्याध्यापिका कु. मयुरी भोई होत्या. विद्यार्थिनी पर्यवेक्षक श्वेता भोई आणि प्रमुख अतिथी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून शाळेला महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांची आकर्षक फोटोफ्रेम भेट



देण्यात आली. मयुरी भोई व श्वेता भोई यांना महापुरुषांचे ग्रंथ भेट शिक्षक दिनाचे औचित्य साधून पी. डी. पाटील यांच्याकडून विद्यार्थिनी मुख्याध्यापिका कु. मयुरी भोई व पर्यवेक्षक श्वेता भोई यांना महात्मा फुले लिखित 'ब्राह्मणांचे कसब' तसेच 'सावित्रीमाई फुले' हे अनमोल ग्रंथ भेट देण्यात आले. यानंतर जया सोनवणे व श्वेता भोई यांनी महात्मा फुले, सावित्रीमाई फुले व इतर महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार व पी. डी. पाटील यांनी महापुरुषांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडले. विद्यार्थ्यांनी व्यक्त केला शाळा चालविण्याचा अनुभव एका दिवसासाठी विद्यार्थी-शिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारलेल्या दिपाली भोई, डिगंबर कुंभार, राकेश केदार, मानव करोसिया, भूमिका चंडाले, रामेश्वरी चंडाले तसेच विद्यार्थी सेवक घनश्याम भिल, शुभम मोरे, करण भिल आणि ज्ञानेश्वर भिल यांनी शाळा चालविण्याचा अनुभव कथन करून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मयुरी भोई यांनी एका दिवसासाठी मुख्याध्यापक म्हणून काम करण्याचे महत्त्व सांगितले. दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेचा कारभार प्रत्यक्ष हाताळण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्याध्यापक जे. एस. पवार यांचे विद्यार्थ्यांनी आभार मानले. ग्रंथपाल गोपाल महाजन यांचा वाढदिवसही साजरा शाळेचे ग्रंथपाल गोपाल महाजन यांच्या जन्मदिनानिमित्त मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

---

## न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर येथे शिक्षक दिन

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी: नशिराबाद शिक्षण मंडळ संचलित न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रविण महाजन उपस्थित होते तर मंचावर विद्यार्थी मुख्याध्यापक गितेश चव्हाण , विद्यार्थी उप मुख्याध्यापक मृणाल चौधरी , पर्यवेक्षक तन्वी माळी आणि विद्यालयाचे उपशिक्षका मंगला चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात



भारताचे माजी राष्ट्रपती यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत वर्गावर अध्यापन केले. विद्यार्थीच शिक्षक बनल्याने शाळेत एक वेगळाच उत्साह दिसून आला. इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त केले. तसेच स्वरा अत्तरदे, देवेंद्र भोई, त्रिशा माळी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे सादर केले. विद्यालयाच्या उपशिक्षिका मंगला पिंगळे यांनी आपल्या मनोगतात शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करत, गुरु-शिष्य परंपरा ही भारतीय संस्कृतीची ओळख असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान राखावा असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमानंतर संस्थेचे कार्याध्यक्ष व नशिराबाद नगरीचे नगराध्यक्ष योगेश पाटील, जेष्ठ संचालक जनार्दन माळी, ॲड प्रदीप देशपांडे व माध्यमिक उपशिक्षक जे वाय महाजन यांनी शिक्षकदिन निमित्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

---

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कास्ट्राईब महासंघाचे आंदोलन स्थगित

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या जीवित, आरोग्य आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे यांच्या वतीने नाशिक येथील गोल्ड क्लब, इदगाह मैदान येथे ५ सप्टेंबरपासून प्रस्तावित करण्यात आलेले बेमुदत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. आदिवासी विकास आयुक्तालय स्तरावरील बैठकीचे इतिवृत्त महासंघाला प्राप्त झाले असून, प्रमुख धोरणात्मक मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आदिवासी विकास मंत्री यांच्यासोबत ८ सप्टेंबर २०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या अधिकृत पत्राच्या पार्श्वभूमीवर महासंघाने ५ सप्टेंबरपासून सुरू होणारे नियोजित आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. ८ सप्टेंबरच्या बैठकीत मागण्यांवर चर्चा आगामी बैठकीत महासंघाने यापूर्वी २८ जुलै २०२६ आणि १ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या पत्रांमधील मागण्यांसह विद्यार्थ्यांच्या जीवित, आरोग्य आणि सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ तात्पुरत्या उपाययोजनांपुरता मर्यादित न ठेवता त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने ठोस कार्यवाही करावी, अशी भूमिका महासंघाने घेतली आहे. मागण्या मान्य न झाल्यास २३ सप्टेंबरपासून आंदोलन दरम्यान, ८ सप्टेंबरच्या बैठकीत मागण्यांवर सकारात्मक व ठोस निर्णय न झाल्यास २३ सप्टेंबर २०२६ पासून नाशिक येथील पूर्वनियोजित ठिकाणी बेमुदत आंदोलन अधिक तीव्र स्वरूपात



पुन्हा सुरू करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे अतिरिक्त महासचिव सुशील तायडे यांनी दिला आहे. त्यामुळे ८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बैठकीकडे विद्यार्थी सुरक्षा आणि कर्मचारी संघटनेच्या मागण्यांच्या दृष्टीने लक्ष लागले आहे. विद्यार्थ्यांच्या जीवित, आरोग्य आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे यांच्या वतीने नाशिक येथील गोल्ड क्लब, इदगाह मैदान येथे ५ सप्टेंबरपासून प्रस्तावित करण्यात आलेले बेमुदत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. आदिवासी विकास आयुक्तालय स्तरावरील बैठकीचे इतिवृत्त महासंघाला प्राप्त झाले असून, प्रमुख धोरणात्मक मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आदिवासी विकास मंत्री यांच्यासोबत ८ सप्टेंबर २०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या अधिकृत पत्राच्या पार्श्वभूमीवर महासंघाने ५ सप्टेंबरपासून सुरू होणारे नियोजित आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. ८ सप्टेंबरच्या बैठकीत मागण्यांवर चर्चा आगामी बैठकीत महासंघाने यापूर्वी २८ जुलै २०२६ आणि १ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या पत्रांमधील मागण्यांसह विद्यार्थ्यांच्या जीवित, आरोग्य आणि सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात येणार आहे.

---

## उपवर्गीकरणाविरोधात मुक्ताईनगरात हजारोंचा एल्गार

### सकल बौद्ध समाजाचा विराट मोर्चा; 'आरक्षण अबाधित ठेवा'ची तहसीलदारांकडे मागणी

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी:** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाला विरोध करण्यासाठी मुक्ताईनगर तालुक्यातील सकल बौद्ध समाजाच्या वतीने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी शहरात विराट मोर्चा काढण्यात आला. महिला, पुरुष, युवक-युवती तसेच अबालवृद्धांचा मोठा सहभाग असल्याने शहरातील वातावरण निळ्या ध्वजांनी आणि घोषणांनी भारावून गेले होते. 'आरक्षण उपवर्गीकरण रद्द करा', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कृषी उत्पन्न बाजार समिती, बोदवड रोड येथून दुपारी १२ वाजता मोर्चाला सुरुवात झाली.



बोदवड चौफुली आणि बसस्थानक मार्गे मोर्चा परिवर्तन चौकात पोहोचला. सहभागी समाजबांधवांनी पांढरे वस्त्र परिधान करून गळ्यात निळे रुमाल आणि हातात निळे ध्वज घेतले होते. त्यामुळे मोर्चाचा संपूर्ण परिसर निळ्या रंगात न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले. परिवर्तन चौकात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बौद्ध भिक्खूंच्या उपस्थितीत समाजबांधवांनी त्रिसरण व पंचशील ग्रहण केले. सुनीलपवारयांचेसविस्तरमार्गदर्शन मोर्चानंतर परिवर्तन चौकात आयोजित सभेत मालेगाव येथून आलेले प्रमुख वक्ते सुनील पवार यांनी अनुसूचित जातींच्या आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनुसूचित जातींमधील विविध घटकांच्या संविधानिक आरक्षणाच्या हक्कांवर होणारे संभाव्य परिणाम, सामाजिक व शैक्षणिक परिणाम तसेच या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज यावर त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. यानंतर युवक-युवतींनी पथनाट्याच्या माध्यमातून आरक्षणाचा प्रश्न आणि सामाजिक वास्तव प्रभावीपणे मांडले. पथनाट्याला उपस्थित समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तहसीलदारां मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन मोर्चाच्या वतीने तहसीलदार गिरीश वखारे यांच्याकडे निवेदन साद करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ उपस्थित होते. हे निवेदन तहसीलदारांमार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठवून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात अनुसूचित जातींच्या आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ स्थगित करून रद्द करावी, तसेच उपवर्गीकरणाचा विविध घटकांवर होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय परिणामांचा सखोल अभ्यास करावा, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जातींच्या संविधानिक आरक्षणाच्या हक्काला बाधा पोहोचेल, अशी कोणतीही कार्यवाही करू नये, अशी भूमिका मांडण्यात आली. याशिवाय अनुसूचित जातींच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करावी, नवीन विकासात्मक योजना सुरू कराव्यात तसेच विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी वाढवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.